**नि.दि.दावा.क्रमांक.९७/२०१९**

**निशाणी १७ लगत**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. १ चा पुढील सरतपास शपथेवर सुरु वकील श्री.के.के.मांडे</u>**

**०९.** मी नि.४ सोबत सर्वे नं.४५९ चा सही शिक्कयाचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. दोन पानांना एकत्रीतरित्या नि.२० देण्यात येते. तसेच मी सर्वे नं.४६८अ चा सही शिक्क्याचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्या दोन पानांना एकत्रीतरित्या नि.२१ देण्यात येते. मी गट क्र.७३४,७३५,७३७,७२४ चा सही शिक्कयाचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. त्यांना अनु. नि.२२ ते २५ देण्यात येते. मी फेरफार क्र.५३५ व २६० सही शिक्कयाचा दाखल केला आहे. त्यास अनु.नि.२६ व २७ देण्यात येते.

सरतपास संपला

**<u>साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादीतर्फे वकिल श्री.आर.व्ही.जाधव.</u>**

१०. आम्ही पाच भाऊ आहोत. आजरोजी आम्ही वेगवेगळे राहतो. आमच्या वाटण्या कधी झाल्या हे मला आठवत नाही. कोणत्या गटात किती जमीन आम्ही भावांनी वाटून घेतली व त्याचे क्षेत्र किती हे मी सांगू शकत नाही. कोणत्या भावाची जमीन कोणत्या भावाला लागून होती व कोणत्या गटात होती हे मला आठवत नाही. आमच्यामध्ये तोंडी वाटणी झाली होती. आमच्यामध्ये तोंडी वाटणी कधी झाली हे मला आज आठवत नाही. माझ्या नावे ६६ आर अशोक याच्या नावे ५४ आर इतकी जमीन आली होती व इतर तीन भावांना किती जमीन आली होती हे मला आठवत नाही. गट क्र.७२४ मध्ये मला व अशोकला वाटणी देण्यात आली होती. सदर गटाचा ७/१२ मी दाखल केला आहे. सदर गटाच्या मालकी सदरामध्ये माझे व अशोकचे नाव आहे किंवा नाही हे मला आठवत नाही.

११. माझे व अशोकचे नाव गट क्र.७२४ च्या ७/१२ उताऱ्यावर मालकी सदरी नाही हे माझ्या वकीलांना सांगितल्याचे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.७२४ च्या ७/१२ उताऱ्यावर मालकी व ताबा सदरी प्रतिवादी क्र.३ चे नाव आहे. प्रतिवादी क्र.३ चे नाव मालक व कब्जेदार सदरी असल्यामुळे तो गट क्र.७२४ चा मालक असल्याचे मला आठवत नाही.

१२. वाटणीप्रमाणे माझे नाव ज्या गटाला लागले त्या गटाचा मी मालक झालो आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.३ हा माझा चुलत भाऊ आहे व माझे नाव वाटणी नंतर मालक सदरी लागले तसेच प्रतिवादी क.३ चे नाव गट क्र.७२४ च्या मालक सदरी लागल्यामुळे तो १ हेक्टर १० आर चा मालक व कब्जेदार आहे.

१३. माझ्या दावयामध्ये व पुराव्यामध्ये दावा मिळकत ही ९ हेक्टर २६ आर आहे किंवा ९ एकर २६ आर आहे हे माझ्या लक्षात नाही. दावा मिळकत ही आम्ही भावांनी वाटून घेतली होती. आम्ही दावा मिळकत वाटणी करुन घेतली त्यावेळी त्याचा नंबर ७६८ व ७२४ असा होता. ७६८ मध्ये कोणत्या भावाला किती क्षेत्र आले हे मला आठवत नाही. माणिक वादी क्र.२ याच्या नावे पाझर तलावासाठी २८ आर क्षेत्र संपादीत करण्यात आले होते. त्याचा गट क्र.७५२ होता हे मला आठवत नाही. जमीन संपादीत केल्यानंतर त्याची मिळालेली रक्कम माणिक स्वतः घेतली होती. संपादीत केलेली जमीन माणिक याच्या वाटणीला गेली होती.

१४. हे म्हणणे खरे नाही की, वाटणी झाल्यानंतर आम्ही आमच्या जमीनीचा ताबा घेतला होता. साक्षीदार स्वतः सांगतो की नारायण याचा कोणत्याही जमीनीवर ताबा नव्हता. नारायण यांना वाटणीमध्ये जमीन आली होती. परंतु कालांतराने ७/१२ वरुन त्यांचे नाव निघून गेले. नारायण याच्या नावावर आज रोजी जमीन नाही, परंतु त्याचा ताबा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी नारायणचा कोणत्याही जमीनीवर ताबा नाही. नारायणच्या जमीनीच्या वरलाकडे– बळीराम माहादु

मोतीपल्ले, खालल्याकडे– विठ्ठल मोतीपल्ले, गंगेकडे–दिपक चव्हाण व राकिसाकडे–गाडी रस्ता आहे. नारायण याच्या ताब्यात किती क्षेत्र आहे मी सांगु शकत नाही.

१५. सर्वे क्र.२८१ व २८२ चे जुने सर्वे क्रमांक काय होते हे मी सांगू शकत नाही. मी वरील सर्वे क्रमांकचा ७/१२ उतारा पाहिला नाही. जुने सर्वे क्र.४६८अ व ४६९ई ला नवीन कोणता सर्वे नंबर पडला आहे हे मला सांगता येणार नाही. सर्वे क्र.२८१ व २८२ आणि सर्वे क्र.४६८ व ४६९ई हे महादु येलापा मोतीपल्ले व रखमाजी येलापा मोतीपल्ले यांच्या नावे होते. दोन्ही गटाचे क्षेत्र मी सांगू शकत नाही. माझे आजोबा कधी वारले हे मला कळत नाही. हे म्हणणे खरे आहे की माझ्या आजोबांनी त्यांच्या मुलामध्ये तोंडी वाटणी करुन दिली याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे कोणत्या भावाला किती क्षेत्र दिले हे मला माहित नाही.

१६. माझे वडील व चुलत्यामध्ये वाटणी झाली किंवा नाही हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्र.१ ने गट क्र.७३७ मधील ९४ आर क्षेत्र विक्री केले आहे. मारोती मोतीपल्ले हे माझे भाऊ आहेत. नारायण याने मारोती याच्या नावे गट क्र.७३७ मधील ९४ आर क्षेत्राचे खोटे खरेदीखत करुन दिले किंवा नाही याबाबत मी सांगू शकत नाही. गट क्र.७३७ मध्ये नारायण यांना जमीन होती परंतु त्याचे क्षेत्र मी सांगू शकत नाही.

प्रश्नः नारायण याने मारोतीच्या नावे खरेदीखत केले त्याच्या आधारे ९४ आर क्षेत्राचा मारोतीच्या नावे फेरफार करण्यात आला ?
उत्तरः मग मारोतीची जमीन कुठे गेली.

१७. गट क्र.९२९ हा नारायणच्या नावे होता हे मी सांगू शकत नाही. कारण मी आडाणी आहे. नारायण याने गट नं.९२९ मधील २८ आर क्षेत्र माणिक याच्या नावे वाटणीने दिले याबाबत मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, १० ते १५

वर्षापूर्वी नारायण याने माणिक याला जमीन वाटून दिली होती. ती जमीन १९९७ मध्ये दिली होती याबाबत मी सांगू शकत नाही. नारायण याने नोंदणीकृत वाटणीपत्राने माणिक याचे नावे दिली होती हे मी सांगू शकत नाही.

१८. माझे वडील रुकमाजी मोतीपल्ले यांना वाटणीमध्ये किती जमीन आली होती हे मला सांगता येणार नाही. तसेच कोणत्या सर्वेमध्ये जमीन आली होती हे मला सांगता येणार नाही. गट क्र.२८१ व २८२ मध्ये माझ्या वडीलांना किती क्षेत्र आले होते हे मला सांगता येत नाही. साधारण ३० वर्षापासून आम्ही जमीनीची वेगवेगळी वहिती करतो. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही भाऊ वेगळे राहत असल्यामुळे दाव्यात नमूद केलेले ९ एकर २६ आर क्षेत्र आमच्या ताब्यात नाही.

१९. आमच्या गावामध्ये एकत्रीकरण योजना लागू झाली आहे. परंतु ती कधी लागू झाली हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन १९८८ साली पानगाव मध्ये एकत्रीकरण योजना लागू झाली होती. सर्वे क्र.२८१ व २८२ ला कोणते गट नंबर पडले हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, एकत्रीकरण योजनेमध्ये आमच्या नावे ३ हेक्टर २३ आर क्षेत्र लागले होते. एकत्रीकरण योजनेमध्ये आमच्या नावे बरोबर क्षेत्र आल्यामुळे आम्ही भावांनी त्याची वाटणी करुन घेतली होती हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, एकत्रीकरण योजनेप्रमाणे नोंद झालेल्या वडीलापार्जित जमीनीची आम्ही वाटणी करुन घेतली होती.

२०. माझ्या अंदाजानुसार नारायण याच्या नावाची जमीन उडाल्याचे आम्हाला १० ते १२ वर्षापूर्वी समजले. त्याबाबत आमच्या भावामध्ये चर्चा झाली होती. नारायणची जमीन कोणाच्या हाताने, कुठे व का कमी झाली याची चौकशी आम्ही केली नाही. नारायण याचे नावे कमी झालेली जमीन दुरुस्ती करुन घ्यावी वाटली म्हणून आम्ही दावा दाखल केला. न्यायालयामध्ये दावा दाखल करण्याव्यतीरिक्त नारायण याच्या नावाची जमीन कमी झाली त्याची दुरुस्तीसाठी कोणत्याही कार्यालयात अर्ज दिला नाही.

प्रश्नः जुना सर्वे क्र.४६८ व ४६९ मध्ये येलप्पा कोळी याच्या नावे व कब्जात किती जमीन होती ?

उत्तरः  माझे वडील आम्हाला १० एकर २० गुंठे जमीन असल्याचे सांगत होते. (सदर प्रश्नाला साक्षीदाराने त्यांच्या वडीलांनी त्यांना किती जमीन आहे हे सांगितल्यामुळे सदरचे उत्तर नोंदविण्यात आले)

२१.        फेरफार क्र.५३५ कशाचा होता मला माहित नाही. फेरफार क्र.१८२२ कशाबद्दल झाला होता हे मला सांगता येणार नाही. फेरफार क्र.२६० हा कशाचा आहे व कोणत्या जमीनीबद्दल आहे हे मला सांगता येणार नाही. रुकमाजी व महादु यांच्या मध्ये वाटणी झाली त्यावेळी मी हजर नव्हतो.

प्रश्नः रुकमाजी व महादु यांनी वडीलोपार्जित जमीन किती किती वाटून घेतली ?

उत्तरः त्यावेळी माझा जन्म झाला होता किंवा नाही हे मी सांगू शकत नाही.

**प्रतिवादींच्या विद्वान वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन पुढील उलटतपास तहकूब करण्यात आला.**

श्रवणोत्तर निवेदन सिकृत्ती

Digitally signed by DNYANESHWAR MADHUKAR GITTE
Date: 2025.08.19 17:19:34 +0530

दिनांक १९/०८/२०२५                (ज्ञा.म.गित्ते)

रेणापुर                सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रेणापुर

(कोर्ट नंबर २)